Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-6 | Dec-2014
Available online at www.lbp.world

मराठी भाषा : आव्हाने व उपाय

डॉ. उज्ज्वला दा. लोणकर
शारदाबाई पवार महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय,शारदानगर.तालुका: बारामती. जिल्हा : पुणे.

भाषेच्या गुणांचे वर्णन ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायातील पहिल्या व तिस—या चरणात केले आहे. ते म्हणतात माझ्या मराठीचे बोलणे हे फार कौतुकाचे आहे.माझी मराठी भाषा ही अमृतापेक्षा गोड आहे. तशी जर पैज लावली तर नक्कीच माझी माय मराठी जिंकेल,याची मला खात्री आहे. माझ्या मराठी भाषेतील प्रत्येक अक्षर हे रसाळ आहे.

एवढेच नव्हे तर ओवीत ते म्हणतात, श्रोते हो ऐका माझ्या या मराठी भाषेच्या या रसाळपणाचा लाभ हा कोणालाही आवरता येणार नाही. या रसाळपणाच्य लोभामुळेच त्याचा आस्वाद घेण्यासाठी कानालाही जिभा फुटतील व आनंद घेण्यासाठी शरीरातील सर्व अवयव आपआपसात भांडू लागतील. अशी ही माझी मराठी भाषा मनाला भूरळ घालणारी आहे.

आज आपण २१ व्या शतकात पाऊल टाकलं आणि सगळं जगचं पालटून गेले. संगणकाचे युग म्हणून हे युग ओळखले जाऊ लागले. त्यामुळे मोठया डौलात मिरविणा—या या आपल्या माय मराठीची गळचेपी होऊ लागली. आज पर्यंत आपण पण मोठया अभिमानाने सांगत होतो, आम्ही मराठी भाषीक आहोत. पण आज संगणकाचे युग आहे.परकीय भाषांच्या वर्चस्वामुळे आपली मराठी भाष कोलमडून पडली आहे.तरूण पिढीने तिच्याकडे दुर्लक्ष केले आहे.आपल्या मातेचे दु:ख त्यांना दिसत नाही. त्यांना दिसतो तो फक्त परकीय भाषेचा झगमगाट.

आजकाल कोणी आईला आई साद घालत नाही, तर मम्मी असे म्हणतात. मम्मीचा उच्चार ममी असाही करतात. ममीचा अर्थ म्हणजे मेल्यानंतर जे थडगे बांधले जाते ते. पण आजचे युवक आपल्या जन्मदात्रीलाच ममी म्हणतात.

आजच्या तरूण पिढीला दोष देण्यात काहीच अर्थ नाही, कारण याला जबाबदार पालक वगर्च आहे. पालकांनी आपल्या मुलांवर आपल्या भाषेचे संस्कार करावेत व मगच या झगमगत्या दुनियाकडे वळावे. केळीचे झाड किती जरी सुंदर असले तरी ते कोणी अंगणात लावीत नाही. त्याची जागा बागेपुरती मर्यादीत असते. त्याच प्रमाणे इंग्रजी भाषा ही जास्त महत्वाची वाटली तरी ती शिक्षणापुरतीच मर्यादित ठेवली पाहिजे.

ज्याप्रमाणे अंगणात शोभून दिसते ती तुळस आणि माय मराठीच्या ओठांवर शोभते ती मराठीच.म्हणून अंगणात म्हणजे घरात सुसंस्कार पाहिजेत ते फक्त मराठीतच.

चित्रपटातील एखादी नटी कितीही आवडली तरीही आपण तिला आई म्हणणार नाही.त्याचप्रमाणे इतर कोणतीही भाषा कितीही चांगली असली तरी तिला मातृभाषा किंवा मायबोली म्हणत नाही.

आज मराठी भाषीकांनीच तिच्याकडे पाठ फिरविल्याने मराठीसाठी पर्याय म्हणून तंत्रज्ञान हा विषय ठेवला आहे. यावरून मराठी भाषा ही एक इतिहासकालीन भाषा बनेल की काय ? असे वाटते. या झालेल्या बदलाचा मराठी माध्यमातील मुलांवर फार मोठी अन्याय आहे.

इतिहासचार्य वि.का.राजवाडे यांनी ज्याप्रमाणे मराठीतूनच लिहिन अशी शपथ घेतली, त्याप्रमाणे आम्ही मराठीतूनच पूर्ण संभाषण करणार,प्रत्येक ठिकाणी मराठीचाच स्विकार करणार अशी शपथ घेतली पाहिजे.

मातृभाषा मराठीमुळे विद्यार्थी भरपूर वाचन करतात.कल्पना समजवून घेऊ शकतात. आपले विचार मोकळेपणाने मांडू शकतात.विषयज्ञानाचा पाया पक्का होऊ शकतो.या भक्कम पायावर उच्च शिक्षणातील ज्ञानोपासनेची इमारत चांगली बांधली जाऊ शकते. स्वभाषेत ती समर्थपणे आपले विचार अगदी स्वतंत्रपणे मांडू शकतात. उदा. पुण्याच्या माध्यमिक शिक्षण मंडळाने या बाबतीत शैक्षणिक संशोधन केले असता शास्त्र शाखेचा अभ्यास इंग्रजी माध्यमातून केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीपेक्षा शास्त्र श्शाखेचा अभ्यास मातृभाषेतून केलेल्या विद्यार्थ्यांची प्रगती समाधनकारक दिसून आली.

यावरून असे स्पष्ट होते की, कोणत्याही विषयाची स्पष्ट कल्पना विषयाची व्याप्ती, परिपक्वता ही मातृभाषेच्या माध्यमातून सहज सुलभ होऊ शकते.

उपाय :

१. सर्व शासकीय कामकाज मराठीतून व्हावे.
२. शाळा, महाविद्यालयात व प्रत्येक ग्रामपंचायत, नगापालिका,महानगरपालिका यांना सहा महिन्यातून किंवा वर्षातून एकदा मराठी पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करावे.
३. प्रसार माध्यमांनी मराठीतूनच प्रत्येक शब्द प्रसारीत करावा.
४. नोकरी व व्यवसाय यात मराठी भाषिकांना प्राधान्य द्यावे.
५. शिक्षणाच्या प्रत्येक पातळीपर उदा. १० वी व १२ वी पदवी, पद्व्युत्तर पातळीवर १०० गुणांचा मराठीचा पेपर सक्तीचा करावा.
६. शाळा, महाविद्यालयात व प्रत्येक नगरपालिका व महानगरपालिका यांनी मराठी निबंध, काव्य वाचन व लेखन स्पर्धा यांचे आयोजन करावे.
७. इंग्रजी माध्यमाच्या शाळा व महाविद्यालये यांना सरकाने कोणत्याही प्रकारचे अनुदान देऊ नये व इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या जाहिराती वर्तमानपत्रातून देऊ नयेत.
८. शिक्षण क्षेत्राम सर्व शाखांमध्ये उदा. विधी श्शाखा, अभियंता,वैद्यकीय व तत्सम् सर्व ठिकाणी शिक्षण घेणा—यांना मराठी हा विषय सक्तीचा करावा.
९. दुकानावरील, घरावरील नावांच्या पाटया, वाहनांचे नंबर मराठीतूनच लिहावेत.
१०. तसेच आपण आपल्यापासून सुरूवात करायला हवी. वर्गात हजेरी घेताना हजेरी क्रमांक मराठीतूनच घ्यावा व विद्यार्थ्यांना हजर किंवा उपस्थित म्हणायला सांगावे.
११. आज जसे वाहन चालविताना परवाना जवळ नाही, शिरस्त्राण घातले नाही म्हणून दंड केला जातो, तसे मराठीतून गाडीवर नंबर नाही लिहिला म्हणून दंड आकारला जावा.
१२. ग्राम स्वच्छता अभियानाप्रमाणे ग्राम मराठी अभियान,शहर मराठी अभियान उपक्रम राबवावेत.
१३. शुभ सकाळ, शुभ दुपार,शुभ संध्याकाळ,शुभ रात्री,शुभ दिपावली ,शुभ संक्रांत अशा शुध्द मराठीतच विद्यार्थी, सहकारी व सहवासातील व्यक्तींना शुभेच्छा द्याव्यात.

मातृभाषा मराठीच्यामुळे विद्यार्थी भरपूर वाचन करतात. कल्पना समजाऊन घेऊ शकतात. आपले विचार मोकळेपणाने मांडू शकतात. विषयज्ञानाचा पाया पक्का होऊ शकतो. या भक्कम पायावर उच्च शिक्षणातील ज्ञानोपासनेची इमारत चांगली बांधली जाऊ शकते. स्वभाषेत ती समरस होऊन आपले विचार अगदी समर्थपणे मांडू शकतात. कोणत्याही विषयाची स्पष्ट कल्पना, विषयज्ञानाची व्याप्ती, परिपक्वता ही मातृभाषेच्या माध्यमातून सहज सुलभ होऊ शकते.